।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## EXAMINATION SECTION

Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२२-२३/५७ दिनांक : १९/०४/२०२२

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ,
संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड,
संचालक, उपकेंद्र-लातूर, परभणी,
प्राचार्य, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली,
समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: उन्हाळी-२०२२ परीक्षेसाठी सादर करण्यात येणा-या परीक्षा आवेदनपत्राच्या तारखेबाबत.
संदर्भ: परीक्षा/२०२२-२३/१९, दिनांक ०५/०४/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२२ परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र सादर करणेबाबत खालील प्रमाणे मुदतवाढ व कार्यपध्दतीत बदल करण्यात येत आहे त्याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

१. नियमित शुल्कासह पदवी अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र दिनांक २०/०४/२०२२ ते २३/०४/२०२२ पर्यंत महाविद्यालयात स्विकारणेस मुदतवाढ देण्यात येते. तसेच या नियमित परीक्षा आवेदनपत्राचे शुल्क संबंधीत महाविद्यालयाने दिनांक २६/०४/२०२२ रोजी धनाकर्ष/NEFT/RTGS व्दारे विद्यापीठात भरणा करावेत.
२. नियमित परीक्षा शुल्क व प्रती दिवस रू. ५०/- अतिविलंब शुल्कासह परीक्षा आवेदनपत्र दिनांक २५/०४/२०२२ ते ३०/०४/२०२२ या कालावधीत परीक्षा विभागात सादर करण्याऐवजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्येच सादर करावेत.

महाविद्यालयाने असे विलंबाने सादर होणारे परीक्षा आवेदनपत्र स्विकारतांना ऑनलाईन पध्दतीने संबंधीत विद्यार्थ्याचे नांव त्या त्या दिवशी समाविष्ट करून अतिविलंब शुल्क स्विकारावेत व ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भल्याबाबतची प्रिंट सोबत जोडावी. यामध्ये कोणतीही तफावत येणार नाही याबाबत काळजी घ्यावी. परीक्षा आवेदनपत्राचे विलंब शुल्क, धनाकर्ष/NEFT/RTGS व्दारे दिनांक ०२/०५/२०२२ पर्यंत विद्यापीठामध्ये भरणा करावेत.

वरील संदर्भीय दिनांक ०५/०४/२०२२ रोजीच्या परीपत्रकान्वये परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठामध्ये दिनांक २९ व ३० एप्रिल २०२२ ऐवजी दिनांक ०५ व ०६ मे २०२२ रोजी जिल्हानिहाय सादर करावेत.

तसेच सर्व पद्व्युत्तर अभ्यासक्रम BCA, BCS, B.Sc. (Professional Courses) व B.Voc. या अभ्यासक्रमाच्या परीक्षा हया दुस-या टप्यात प्रस्तावित असल्यामुळे संबंधीत विद्यार्थ्याचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्यास दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या परीक्षा आवेदनपत्र शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS व्दारे दिनांक ०२/०५/२०२२ रोजी विद्यापीठामध्ये भरणा करावेत. तसेच या अभ्यासक्रमाच्या विलंब परीक्षा आवेदनपत्र नियमित परीक्षा शुल्क व पती दिवस रू. ५०/- अतिविलंब शुल्क प्रमाणे महाविद्यालयामध्ये दिनांक ०२/०५/२०२२ ते ०७/०५/२०२२ पर्यंत स्विकारण्यात यावेत. या शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS व्दारे दिनांक ०९/०५/२०२२ रोजी भरून अतिविलंब परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठामध्ये दिनांक ११/०५/२०२२ पर्यंत जिल्हानिहाय सादर करावेत.

सबब, कृपया उपरोक्त प्रमाणे तारखेतील बदलाबाबतची सुचना सर्व संबंधीत विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
मा.संचालक, उपकेंद्र लातूर, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ,
मा.वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ,
अधिक्षक/सहा.अधिक्षक-कला, वाणिज्य व विज्ञान विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.